**लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकरीता ६ अतिरिक्त दूरध्वनी जोडणी MTNL यांच्याकडून घेण्यास तसेच नवीन ई.पी.ए.बी.एक्स यंत्रणा (EPABX System) घेण्यास आणि त्याकरीता येणाऱ्या रू.६,९०,२२०/-(जी.एस.टी. सह) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: एलपीएल२०२६/प्र.क्र.६०/लोकआ**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक- १३ ऑक्टोबर, २०२६.

वाचा : १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टिईएल-१०२४/प्र.क्र.५३/२०२४/(निवास-१), दि.२९.०१.२०२५

२. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि. ११.०८.२०२६

३. प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आस्था/१९८८/नविन दूरध्वनी जोडणी/७/२०२६/१४६७५/२०२६, दि. २७.०७.२०२६

४. प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. आस्था/१९८८/नविन दूरध्वनी जोडणी/७/२०२६/१५७९३/२०२६, दि. १०.०८.२०२६

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये बृहन्मंबईतील शासकीय कार्यालयाकरीता दूरध्वनीबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने संदर्भ क्र. ३ व ४ येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर कार्यालयाकरीता ६ अतिरिक्त दूरध्वनी यंत्रणा व नवीन ई.पी.ए.बी.एक्स यंत्रणा (EPABX System) खरेदी करण्यास आणि त्याकरीता येणाऱ्या रु.६,९०,२२०/- (जी.एस.टी.सह) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकरीता ६ अतिरिक्त दूरध्वनी यंत्रणा व नवीन ई.पी.ए.बी.एक्स यंत्रणा (EPABX System) खरेदी करण्यास आणि त्याकरीता येणाऱ्या रु.६,९०,२२०/- (जी.एस.टी.सह) (अक्षरी रू. सहा लाख नव्वद हजार दोनशे वीस फक्त) इतक्या खर्चास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे:-

I. सदर ई.पी.ए.बी.एक्स प्रणालीची (EPABX System) खरेदी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. १/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील विहीत तरतुदीनुसार खरेदी करणे बंधनकारक राहील.

II. निविदा प्रक्रिया, दरांचा वाजवीपणा, तांत्रिक विनिर्देश व संबंधित शासन निर्णयातील तरतुदींचे अनुपालन याची खातरजमा करण्याची दक्षता घेण्यात यावी.

III. सदर निधी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, अटी व शर्तीची पूर्तता करण्यात यावी.

IV. निधी खर्चाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

२. यावर होणारा खर्च "मागणी क्र. ए-०४, २०७०, इतर प्रशासकीय सेवा-(१०४), (००) (०१) लोक आयुक्त, (अनिवार्य) (२०७० ००८५) १३- कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम दि.११.०८.२०२६ भाग- पहिला, उपविभाग-२ अनुक्रमांक-१९, नियम क्र.६२ अन्वये प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या अनौ.सं.क्र.४०/२०२६/निवास-१, दि.२७/०८/२०२६ व वित्त विभागाच्या अनौ. सं.क्र.५६१/ व्यय-४,दि.२१.०९.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१३१६०५१०१३०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NEETA EKNATH SHINDE

Digitally signed by NEETA EKNATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F2BFFD6992498E56663024368C72B33364CFB066D536 82C53A425E54D187A7C1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F325D659F47933958AA2D98F394DB95F94BE575 48776492BA36E77EA1C4AA53B, cn=NEETA EKNATH SHINDE
Date: 2026.10.13 16:06:50 +05'30'

**( निता शिंदे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रबंधक, लोक आयुक्त , महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -३२
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई
६) सामान्य प्रशासन विभाग, (निवास-१) /अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई
७) निवडनस्ती.